पोलीस दादांच्या आशीर्वादाने बेलगाव परिसरात अवैध धंद्यांना उधाण? >> पान 2

आ.सिद्धार्थ खरात आज जिजाऊ चरणी होणार नतमस्तक >> पान 3

केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रयत्नाला यश! >> पान 4

दैनिक

# आपला विदर्भ



क्रिकेट पाठोपाठ जाहिरातींच्या जगातही धोनी ठरतोय 'किंग'

आतील पान

**सुविचार**

समस्या ह्या संधींमध्ये बदलता येतात.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 120 ■ बुधवार, दि. 11 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## जनतेला मोफत रेशनवर किती दिवस जगवणार

### रोजगार निर्मितीवर काम करा; सुप्रीम कोर्टानं सरकारला झापलं

नवी दिल्ली : भारतामध्ये आजही मोठ्या संख्येनं काही नागरिक मोफत रेशन सुविधेवर अवलंबून असतात. अशा सर्व नागरिकांसाठी सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीदरम्यान उपस्थित करण्यात आलेला एक प्रश्न धक्का देणारा ठरू शकतो. कोरोना काळापासून देशात प्रवासी मजुरांना दिल्या जाणाऱ्या मोफत रेशन सुविधेवर सर्वोच्च न्यायालयाने हे आणखी किती दिवस असंच चालत राहणार, केव्हापर्यंत मोफत रेशनपुरवठा केला जाणार? असा थेट सवाल केला.

न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाच्या वतीनं महाधिवक्ता तुषार मेहता आणि अतिरिक्त महाधिवक्ता ऐश्वर्या भाटी यांच्यापुढं महत्त्वाचं निरीक्षण मांडताना, 'याचा अर्थ फक्त करदातेच यापासून वंचित राहणार' हा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला.

रोगजारनिर्मितीवर काम का होत नाही?



२०२० साली कोरोना महासाथीच्या कालावधीमध्ये प्रवासी मजुरांसमोर उभ्या राहिलेल्या समस्या आणि अडचणींसंदर्भात स्वत: दखल घेत एका बिगरसरकारी संघटनेची भूमिका ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी मांडली. त्यांनी या मजुरांना तातडीने दिलासा देण्याची मागणी करताना 'ई–श्रम' पोर्टलवर नोंदणी असलेल्या सर्व प्रवासी मजुरांना मोफत राशन पुरवण्याचे निर्देश देण्याची गरज असल्याचं मत भूषण यांनी युक्तीवाद करताना मांडला. यावर खंडपिठाने, 'केव्हापर्यंत मोफत रेशन दिलं जाऊ शकतं? आपल्याकडे या प्रवासी मजुरांसाठी रोजगाराच्या संधी, रोजगार आणि तत्सम संधींवर काम का केलं जात नाही?' असा सवाल उपस्थित केला.

एका खासगी संघटनेच्या वतीनं युक्तिवाद करणाऱ्या प्रशांत भूषण यांनी न्यायालयापुढं मांडलेल्या परिस्थितीनुसार राज्य आणि सर्व केंद्रशासित प्रदेशांमधील प्रवासी मजुरांसाठी रेशन कार्ड जारी करण्याचे निर्देश वेळोवेळी जारी करण्यात आले आहेत. जेणेकरून त्यांना केंद्र शासनाच्या वतीनं दिल्या जाणाऱ्या मोफत रेशन सुविधेचा लाभ घेता येईल. त्यांच्या माहितीनुसार नव्या आदेशान्वये ज्यांच्याकडे रेशन कार्ड नाही, पण जी मंडळी 'ई–श्रम' पोर्टलवर नोंदणीकृत आहेत त्यांनाही मोफत रेशन सुविधेचा लाभ दिला जावा.

न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी मात्र इथं हरकत दर्शवत, 'हीच समस्या आहे...' असा कटाक्ष टाकला. 'जेव्हा आपल्याकडून राज्यांमधील प्रवासी मजुरांना मोफत रेशन देण्यासंदर्भातील आदेश पारित केले जातील तेव्हा प्रत्यक्षात इथं कोणीच नसेल, सर्वांनीच पळ काढलेला असेल. जनतेची मनं जिंकण्यासाठी राज्य शासन रेशन कार्ड जारी करु शकतात कारण, मोफत रेशन वाटपाची जबाबदारी केंद्राची आहे हे ते जाणतात. मुळात आपण इथं राज्य आणि केंद्र अशी विभागणीच केली नाही पाहिजे, अन्यथा परिस्थिती आणखी बिघडेल', असं ते म्हणाले.

दरम्यान, तुषार मेहता यांनी याचिकाकर्त्यांच्या मुद्द्यांवर आक्षेप घेत सदरील आदेश कोविडपुरता सीमित असून, त्यावेळी प्रवासी मजुरांच्या समस्या आणि त्यांच्यापुढील आव्हानं केंद्रस्थानी ठेवत ते पारित करण्यात आले होते. मुळात सरकार २०१३ च्या अधिनियमाअंतर्गत बांधील असून, त्यायोजनेचं उल्लंघन केलं जाऊ शकणार नाही. महाधथिवक्ता आणि प्रशांत भूषण यांच्यामध्ये या सुनावणीदरम्यान शाब्दिक मतभेदही पाहायला मिळाले जिथं 'नागरिकांना दिलासा देण्याऐवजी सर्वोच्च न्यायलयात याचिका दाखवल करण्यात व्यग्र असणाऱ्या स्वयंसेवी संस्थेच्या आकडेवारीवर विश्वास नाही ठेवला पाहिजे', असा मुद्दा महाधिवक्त्यांनी अधोरेखित केला होता. सदरील सुनावणीदरम्यान देशातील ८१ कोटी जनतेला राष्ट्रीय खाद्य सुरक्षा अधिनियम २०१३ च्या अंतर्गत मोफत रेशन वितरित केलं जातं ही वस्तूस्थिती दोन्ही न्यायमूर्तीनाही हैराण करणारी ठरली.

## श्री सिद्धिविनायक मंदिर राहणार ५ दिवस बंद!

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबईतील भाविकांचे श्रद्धास्थान असलेले दादरचे प्रसिद्ध सिद्धिविनायक गणपती मंदिर बुधवारपासून पुढील पाच दिवसांसाठी बंद राहणार आहे. या मंदिरात लाखोंच्या संख्येने भाविक श्रद्धेने लांबून दर्शनासाठी येत असतात. परंतु येत्या १४ डिसेंबर ते १८ डिसेंबर या पाच दिवसांसाठी सिद्धिविनायक मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद राहणार आहे. श्रींच्या प्रतिमेचे दर्शन भाविकांना १९ डिसेंबरला दुपारपासून घेता येणार आहे.

श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे भाविकांना आवाहन करत बुधवार दिनांक १४ डिसेंबरपासून ते रविवारी दिनांक १८ डिसेंबर २०२२च्या कालावधीमध्ये श्रींच्या मूर्तीला सिंदूर लेपन करण्यात येणार असल्याची माहिती दिली. त्यामुळे त्या कालावधीमध्ये भाविकांना प्रत्यक्ष श्रींच्या मूर्तीचे दर्शन बंद असेल, याऐवजी श्रींच्या प्रतिमेचे दर्शन घेता येईल असे, श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

## झाडांची अवैधरीत्या कत्तल करणाऱ्यांची आता खैर नाही, शासनाने घेतला मोठा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : शहरीकरण वाढत जात आहे तसं तसं प्रदुषणाची पातळी वाढत आहे. झाडांची बेसुमार कत्तल करण्यात येत आहे. मात्र, आता झाडांची अवैधरित्या कत्तल करणाऱ्यांवर शासनाने कठोर कारवाईचा बडगा उचलला आहे. अनधिकृतरीत्या झाड तोडण्यासाठी असलेली एक हजार रुपयांची शिक्षा आता थेट ५० हजार रुपये करण्यात आली आहे. याबाबत शासन अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आल्याची माहिती सोमवारी विधानसभेच्या पटलावर ठेवण्यात आली आहे. या निर्णयामुळं आता वृक्षतोड करणाऱ्यांवर चाप बसणार आहे.

राज्य शासनाने अधिनियमात सुधारणा करून अवैधरीत्या झाडे तोडणाऱ्या व्यक्तीस आता ५० हजार रुपयांचा दंड ठोठावण्याची तरतूद केली आहे. यापूर्वी या गुन्ह्यासाठी एक हजार रुपये दंडाची तरतूद होती. झाडे तोडण्याबाबत अधिनियम १९६४



कलम २ मध्ये अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आली आहे. मुंबई महापालिका आणि राज्यातील अन्य नगरपालिका परिसरात करण्यात येणाऱ्या अवैध वृक्षतोडीला पायबंद घालण्यासाठी ही तजवीज करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वृक्ष अधिकारी यांनी चौकशी केल्यानंतर आणि संबंधित व्यक्तीला बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर योग्य तो निर्णय घेऊन हा दंड आकारण्यात यावा, असं अध्यादेशात नमूद केले आहे. या बरोबरच या दंडाची रक्कम ५० हजारांपर्यंत करण्याचेही आदेशात म्हटलं आहे. या निर्णयामुळं वृक्षतोड करणाऱ्यांना जरब बसेल, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे.

झाडं तोडणं म्हणजे काय?

'झाड तोडणे' या व्याख्येमध्ये झाड मारून टाकण्यासाठी किंवा त्याचा नाश करण्यासाठी ते जाळणे, कापणे किंवा छाटणे अथवा झाडाच्या बुंध्याभोवतालची साल कोरणे, गर्डलिंग करणे किंवा झाडाची साल काढणे या कृत्यांचा समावेश आहे.

झाडं तोडण्यासाठी कुठे परवानगी घ्यावी लागेल

झाडं तोडण्यासाठी ग्रामीण भागात, वन विभाग, महसूल विभाग यांच्या स्थानिक कार्यालयामार्फत वरिष्ठांकडे परवानगीसाठी प्रस्ताव पाठवला जातो. पर्यावरणाच्या रक्षणासाठी हा निर्णय खूप महत्त्वाचा असून सर्वांनी याचे पालन करावे, असं अवाहन करण्यात येत आहे.

खालील सोळा झाडे अनूसुचित करुन ती तोडण्यास शासनाने बंदी घातली आहे

हिरडा, साग, मोह, चिंच, आंबा, जांभूळ, खैर, चंदन, तिवस, अंजन, किंजळ, फणस, हळदू, बीजा, ऐन, मॅनग्रोव्ह

## बाजारपेठांमध्ये शुकशुकाट, विद्यार्थ्यांना अर्ध्या शाळेतून सोडलं, बांगलादेश हिंसाचारप्रकरणी मराठवाड्यात रोष

दैनिक आपला विदर्भ

**परभणी/प्रतिनिधी** :गेल्या महिन्याभरापासून बांगलादेशमध्ये हिंसाचार उफाळलाय. गेल्या काही दिवसांपासून बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या हिंसाचाराच्या घटनाही वाढल्या आहेत. दरम्यान ४ डिसेंबर रोजी जमावाने हिंदूंच्या शंभरहून अधिक घरांची तोडफोड केली. हिंदूंवर होणाऱ्या हल्ल्यांचा आता भारतभर रोष दिसून येत आहे. बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराचा विरोधात मराठवाड्यात कडकडीत बंद पाळला जात असल्याचे चित्र आहे. बाजारपेठांमध्ये शुकशुकाट असून अनेक जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयांवर मोर्चा काढण्यात येणार आहे. परभणीत शाळा महाविद्यालयातून विद्यार्थ्यांना सोडण्यात आलंय. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात हिंदू जनजागरण समितीकडून जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने आंदोलन करण्यात येत आहेत. यात रामगिरी महाराजही सहभागी झालेत.

परभणीत शुकशुकाट, जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

बांगलादेश मध्ये होत असलेल्या हिंदूवरील अत्याचाराचा विरोधात मराठवाड्यात रोज उफाळला आहे. आज सकाळपासून परभणी आणि परळीत बंद पुकारण्यात आलाय. बाजारपेठांमध्ये शुकशुकाट दिसत असून शाळा व महाविद्यालयातूनही विद्यार्थ्यांना सोडण्यात आलंय. सकल हिंदू समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर परभणीत मोर्चा काढण्यात येणार असून मोठ्या प्रमाणावर हिंदू बांधव या मोर्चात सहभागी होणार आहेत.

परळीत बांगलादेश अत्याचाराचे पडसाद

बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारा विरोधात बीडच्या परळीत आज परळी बंदची हाक दिली आहे. सकाळपासून व्यापाऱ्यांनी आपली आस्थापने बंद ठेवून बंदला पाठिंबा दिलाय. बांगलादेशात हिंदू धर्मीयांवर अत्याचार होत असून त्याचे पडसाद सर्व ठिकाणी पाहायला मिळतात. परळी शहर आज कडकडीत बंद पाळत असल्याचे चित्र आहे. राणी लक्ष्मीबाई टॉवर चौकात निषेध नोंदवण्यासाठी परळीकर उपस्थित राहणार आहेत.

छत्रपती संभाजीनगरमध्ये रामगिरी महाराजही मोर्चात उतरले

बांगलादेश हिंदू अत्याचार विरोधात छत्रपती संभाजीनगरमध्ये हिंदू जनजागरण समितीतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनात वादग्रस्त ठरलेले महंत रामगिरी महाराज उतरले असून रामगिरी महाराज यांनी आजच्या आंदोलनात कोणतेही प्रक्षबक वक्तव्य करू नये याची खबरदारी घेण्यात आली आहे. आजच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा मोठा ताफा तैनात असणार आहे. शिवाय रामगिरी महाराजांना आंदोलनात कोणतेही वादग्रस्त वक्तव्य न करण्याची नोटीसही देण्यात आली आहे.

## संसदेचं हिवाळी अधिवेशन २०२४ : विरोधकांच्या प्रचंड गदारोळानंतर लोकसभा, राज्यसभा उद्यापर्यंत तहकूब

नवी दिल्ली : संसदेच्या हिवाळी अधिवेशनात विरोधकांनी आज प्रचंड गदारोळ केला. त्यामुळे राज्यसभा आणि लोकसभा उद्यापर्यंत तहकूब करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली. आज सकाळी लोकसभा सुरू झाल्यानंतर लगेच विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर कथित अदानी प्रकरणावरुन आरोप करण्यास सुरुवात केली. मात्र सत्ताधाऱ्यांनी विरोधकांवर सोरोस प्रकरणावरुन आरोप केल्यानं मोठा गदारोळ झाला. विरोधकांच्या प्रचंड गदारोळानंतर लोकसभा अध्यक्षांनी सभागृह उद्यापर्यंत तहकूब करण्यात येत असल्याची घोषणा केली. तर दुसरीकडं राज्यसभा सभापतींनीही विरोधकांच्या गदारोळानंतर सभागृह उद्यापर्यंत तहकूब करण्याची घोषणा केली.

विरोधकांचा सत्ताधाऱ्यांवर आरोप : संसदेचं हिवाळी अधिवेशन २०२४ मध्ये आज चांगलाच वाद रंगला. आज सकाळीच लोकसभा आणि राज्यसभा तहकूब करण्यात आल्यानं विरोधकांनी मोठा हल्लाबोल केला. काँग्रेस खासदार किरण कुमार चमला म्हणाले, की ''आज सकाळी आम्ही सभागृह चालावं या इराद्यानं सभागृहात दाखल झालो. मात्र अध्यक्ष सभागृह न चालवण्याच्या इराद्यानं आले असावेत. त्यांनी विरोधकांना चिथावणी देण्याचा प्रयत्न केला. सत्ताधारी पक्षाचे सदस्य आम्हाला भडकवण्याचा प्रयत्न करत होते. त्यामुळे हिवाळी अधिवेशन होऊ नये, अशी सत्ताधाऱ्यांची इच्छा आहे,'' असा आरोप त्यांनी केला.

## मनोज जरांगे पाटील यांनी मस्साजोग गावाला भेट गेत ग्रामस्थांशी साधला संवाद





दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी** : बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून निर्गुणपणे खून करण्यात आला. या प्रकरणात मनोज जरांगे पाटील यांनी मस्साजोग गावाला भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला आहे. संतोष देशमुख यांच कुटुंब उघड्यावर पडले असून त्यांना न्याय मिळणे आवश्यक आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी अद्याप फरार आहे. कुटुंबाकडून सीआयडी चौकशीची मागणी केली जात आहे. सदरील प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालून आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी प्रकरण दाबण्याच्या भानगडीत पडू नका. या प्रकरणात जातीचे लोक पाठीशी घालू नका हा रास्ता रोको नाही तर न्यायाची प्रक्रिया आहे. महाराष्ट्रातील जनतेने संयम दाखवा असे आवाहन जरांगे पाटील यांनी केले आहे. मुख्यमंत्र्यांनी हा विषय तातडीने हाताळावा तुम्ही संवेदनशील असाल तर हे शांततेत हाताळा. २४ तास उलटून देखील अद्याप मृतदेहावर अंत्यसंस्कार झालेले नाही. त्यामुळे हे प्रकरण गंभीर घेणे गरजेचे असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटल आहे.

## कोच गौतम गंभीर ॲक्शन मोडवर, कोहली अन् रोहितबाबत घेतला मोठा निर्णय, टीम इंडियाला होणार फायदा?

**मुंबई/प्रतिनिधी** : भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया कसोटी मालिका आता रोमांचक वळणावर पोहोचली आहे. ५ सामन्यांच्या मालिकेत दोन्ही संघांनी १–१ असा विजय मिळवला आहे. तिसरा कसोटी सामना १४ ते १८ डिसेंबर दरम्यान ब्रिस्बेनच्या गाबा मैदानावर खेळवला जाईल. ॲडलेडमध्ये खेळल्या गेलेल्या दुसऱ्या सामन्यात टीम इंडियाला लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले. दोन्ही डावात भारताची फलंदाजी फेल ठरले. याचा अंदाज तुम्ही यावरून लावू शकता की टीम इंडियाला दोन्ही डावांत ९० षटकेही खेळता आली नाहीत.

ॲडलेड कसोटीत तीन दिवसांत दारूण पराभव पत्करावा लागल्यानंतर टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आता ॲक्शन मोडवर आले आहेत. दुसरी कसोटी संपताच त्याने खेळाडूंना विश्रांती न घेता सराव करण्यास सांगितले.

## सरपंचाचं अपहरण अन् हत्या, नातेवाईक आक्रमक

### २४ तास उलटूनही आरोपी मोकाट, कुटूंब उतरलं रस्त्यावर

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी** : केज (खर) तालुक्यातील मस्साजोग येथे सरपंचाचे अपहरण करून खून करण्यात आल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. संतोष देशमुख असे सरपंचाचे नाव असून त्यांचा मृतदेह केज परिसरात आढळून आला. यानंतर मृताचे नातेवाईक संतप्त झाले असून अहमदनगर –अहमदपूर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, संतोष देशमुख व त्यांचा वाहन चालक हे चारचाकी गाडीतून मस्साजोगकडे जात होते. यावेळी डोणगावजवळ दोन वाहनातून येऊन



अज्ञात व्यक्तींनी त्यांची गाडी अडवली. अपहरणकर्त्यांनी सरपंच संतोष देशमुख यांना त्यांच्या कारमधून बाहेर काढल्यानंतर काठीने बेदम मारहाण केली. नंतर अपहरणकर्त्यांनी त्यांना बळजबरीने ते आलेल्या गाडीत बसवून केजच्या दिशेने नेले. याबाबत केज पोलीस ठाण्यात अपहरणाची तक्रार दाखल करण्यात आली होती. घटनेचं गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी तपास सुरु केला होता. मात्र काही तासानंतर बोरगाव–दहीटना रस्त्यावर संतोष देशमुख यांचा मृतदेह आढळून आला.

मृताचे नातेवाईक आक्रमक

संतोष देशमुख हे त्यांच्या अनेक चांगल्या कार्यामुळे तालुक्यात परिचित होते. त्यांनी मस्साजोग ग्रामपंचायतला अनेक पुरस्कार मिळवून दिले आहेत. या घटनेमुळे तालुक्यात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. आता या प्रकरणी अहमदनगर–अहमदपूर महामार्गावर रास्ता रोको केला जात आहे. मृताचे नातेवाईक संतप्त झाले असून रास्ता रोको करत गुन्हा दाखल झालेल्या आरोपींना अटक करण्याची मागणी केली जातेय. रास्ता रोकोच्या ठिकाणी अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक दाखल झाले असून नातेवाईकांची समजूत काढली जात आहे.

पुण्यात देखील अपहरण अन् हत्या

दरम्यान, पुणे विधानपरिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश वाघ यांचे अपहरण झाले होते. आता सतीश वाघ यांचा खून झाल्याचे उघड झाले आहे. यवत गावच्या हद्दीत त्यांचा मृतदेह सापडला आहे. सतीश वाघ हे मॉर्निंग वॉकला गेले होते. घरापासून काही अंतरावर जाताच चार जणांनी त्यांना जबरदस्तीने एका चारचाकी वाहनात डांबले आणि काही समजण्याच्या आतच त्यांचं अपहरण केलं होतं. मांजरा परिसरात ही घटना घडली घडली होती.

## अभिनयातील भीष्माचार्य दिलीपकुमार

ट्रॅजीडी किंग म्हणून ओळखले जाणारे हिंदी चित्रपट सृष्टीतील भीष्माचार्य दिलीपकुमार यांची आज जयंती. बरोबर १०२ वर्षांपूर्वी म्हणजे ११ डिसेंबर १९२२ रोजी दिलीपकुमार यांचा जन्म पेशावर येथे झाला. त्यांचे मूळ नाव मोहम्मद युसूफ खान असे होते. पेशावरहून त्यांचे कुटुंब उदरनिर्वाहासाठी मुंबईत आले. दिलीपकुमार यांच्यासह बारा भावंडे होते. त्यांच्या कुटुंबात पाहुण्यांचाही राबता होता त्यामुळे आपणही काही तरी काम करून घर खर्चास मदत करावी असा विचार करून दिलीपकुमार पुण्याला आले. तिथे त्यांनी लष्करी कॅंटीनमध्ये मॅनेजरचा सहाय्यक म्हणून काम केले. दुसऱ्या महायुद्धात लष्करी कॅंटीनचे व्यवस्थापन बदलले आणि दिलीपकुमार जमा केलेले पाच हजार रुपये घेऊन घरी परत आले. मुंबईला आल्यावर त्यांना पुन्हा नोकरी शोधावी लागली. दिलीपकुमार हे नोकरीच्या शोधात आहे हे त्यांचे परिचित डॉ मसानी यांना समजले तेंव्हा डॉ मसानी यांनी त्यांना माहीम येथील बॉम्बे टॉकीजच्या स्टुडिओमध्ये देविका राणी यांच्याकडे घेऊन गेले. देविका राणी यांनी दिलीपकुमार यांचे राजबिंडे व्यक्तिमत्त्व आणि उर्दूवरील पकड पाहून त्यांना महिना बाराशे रुपये पगारावर अभिनय करण्याची ऑफर दिली. वास्तविक हा प्रस्ताव दिलीपकुमार यांना मान्य नव्हता कारण चित्रपटात अभिनय करावा असा विचार त्यांनी कधीही केला नव्हता पण महिना बाराशे रुपये मिळतात ही रक्कम त्याकाळी खूप मोठी होती त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारला आणि देशाला एक महान अभिनय सम्राट मिळाला. देविका राणी यांनीच त्यांना दिलीपकुमार हे नाव दिले. १९४४ साली आलेल्या ज्वार भाटा या चित्रपटाद्वारे दिलीपकुमार यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरवात केली. १९४४ ते १९९८ पर्यंत म्हणजे सहा दशकापेक्षा अधिक काळ दिलीपकुमार यांनी आपल्या अभिनयाने गाजवून सोडला. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट सुपरहिट झाले. यात त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. अंदाज, राम और श्याम, आन, देवदास, आझाद, मुगल – ए – आझम, गंगा जमुना, नया दौर हे त्यांचे चित्रपट तर सुपरहिट झाले. या चित्रपटांनी तरुणाईला वेड लावले. १९५७ साली आलेल्या गंगा जमुना या चित्रपटातील मांग के साथ तुम्हारा...मैने मांग लिया संसार....या गाण्याने तरुणाईला वेड लावले होते. या चित्रपटात वैजयंती माला या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट रसिक त्यांच्या अभिनयाने इतके भारावले होते की त्याकाळच्या तरुणांचे ते आयडॉल बनले. देवदास या चित्रपटातील त्यांची भूमिका ही तर त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. त्यांच्या या चित्रपटातील भूमिकेचे नंतर अनेक अभिनेत्यांनी अनुकरण केले पण कोणालाही त्यांच्या अभिनयाच्या जवळपास पोहचता आले नाही. १९७६ साली आलेला बैराग हा चित्रपट त्यांचा नायक म्हणून शेवटचा चित्रपट ठरला या चित्रपटात त्यांनी तिहेरी भुमीका साकारली. त्यानंतर काहीकाळ ब्रेक घेऊन त्यांनी मनोज कुमार यांच्या क्रांती या चित्रपटापासून चरित्र अभिनेता म्हणून काम करण्यास सुरुवात केली. शक्ती, विधाता, मजदूर, दुनिया, मशाल, कर्मा या चित्रपटात त्यांनी चरित्र भूमिका केल्या. सुभाष घई यांच्या सौदागर या चित्रपटात राजकुमार यांच्यासोबत त्यांची जुगलबंदी चांगलीच गाजली. १९९८ साली आलेला किला हा त्यांनी अभिनय केलेला शेवटचा चित्रपट ठरला. या दरम्यान त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी दिलीपकुमार यांना आठ पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांच्या अभिनय कारकिर्दीची योग्य दखल घेऊन पद्मभूषण, पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने त्यांना गौरवले. हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले. पाकिस्ताननेही त्यांना निशान – ए – इम्तियाज या त्यांच्या सर्वोच्च पुरस्काराने गौरवले आहे. ७ जुलै २०२१ रोजी वयाच्या ९८ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे दुःखद निधन झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीचेच नाही तर देशाचे मोठे नुकसान झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने अभिनयातील भीष्माचार्य काळाच्या पडद्याआड गेला. त्यांचा सारखा अभिनेता पुन्हा होणार नाही. अभिनय सम्राट दिलीपकुमार यांना विनम्र अभिवादन!

# पोलीस दादांच्या आशीर्वादाने बेलगाव परिसरात अवैध धंद्यांना उधाण?

## वरिष्ठांनी लक्ष देण्याची गरज : सर्वसामान्य जनता त्रस्त

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

### डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध धंदे भाग १

**बेलगाव :** डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या बेलगाव परिसरात पोलीस दादा बीट जमादार यांच्या आशीर्वादाने अवैधधंदे जोमात सुरू आहेत. तर सर्वसामान्य जनता ही या अवैध धंद्याने त्रस्त झाली आहे. पोलीस प्रशासनाच्या नाकावर टिचून हा अवैधं धदे राजरोसपणे सुरू असल्याने याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन या अवैध धंद्यांना लगाम लावणार..? त्याचबरोबर याकडे दुर्लक्ष करणाऱ्या बीट जमादारावर पोलीस दादांनवर कठोर कारवाई करणार..?, अशी मागणी बेलगाव परिसरातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे. डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या बेलगाव परिसरात अवैध धंद्यांना अनेक दिवसांपासून अच्छे दिन आले आहेत. या अवैध धंद्यांमुळे परिसरातील महिला त्रस्त झाल्या आहेत. अनेक महिलांना दारूड्यांकडून अनेक प्रकारच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.परिसरात अवैध धंदे खुलेआम सुरू असताना याकडे पोलीस प्रशासनातील जबाबदार असलेल्या बीट जमादारच याकडे कानाडोळा करत असल्याने या काना डोळ्याला काय अर्थ लावावा असा प्रश्न सर्वसामान्यांमध्ये निर्माण होत आहे. बेलगाव परिसरात वरली जुगार अवैध गावरान दारू विक्री यासह अनेक अवैध धंदे राजरोसपणे सुरू आहेत.



पोलीस प्रशासनाच्या नाकावर टिचून अवैध धंदे करणारे केली जात असल्याने या अवैध धंद्यावर कोण लगाम लावेल असा प्रश्न निर्माण झाला आहे. पोलीस प्रशासनाची याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही सर्वसामान्यांकडून व्यक्त केला जात आहे. तर पोलिसांच्या आशीर्वादाने अवैध धंदे करणारे कोणालाही जुमानत नसल्याने बेलगाव परिसरात अवैधं धदे करणाऱ्यांची मनमानी सुरू झाली आहे. पोलीस प्रशासनाच्या या दुर्लक्षित धोरणामुळे मात्र सर्वसामान्य नागरिक वेटीस धरली जात आहे. गावात खुलेआम अवैध दारू विक्री होत असल्याने गोरगरीब सर्वसामान्यांचा कुटुंबाचा संसार उघड्यावर येत आहे. परिणामी गावात तंटे निर्माण होण्याच्या संकेतही प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येत आहे. अवैध दारू विकरणाऱ्यांवर कारवाई करणाऱ्या पोलीस प्रशासनाचे आशीर्वाद असल्याने अवैध धंदे करणारे हे कोणालाही जुमानत नसल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. या गावातच अवैध धंदे मोठ्या प्रमाणात सुरू असल्याने युवक हे व्यसनाच्या आहारी जात जात असल्याची खमंग चर्चा आहे. पोलीस प्रशासन हे आपल्या अर्थपूर्ण संबंधाने स्वहतासाठी मात्र सर्वसामान्यांना संसार उघड्यावर आणत असल्याचा प्रकार परिसरात दिसून येत आहे. सर्वत्र खुलेआम अवैध धंदे सुरू असताना बीट जमादारांनी याकडे लक्ष देऊन अवैध धंदे करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची गरज असताना याकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याने पोलीस प्रशासनाचे हे दुर्लक्ष का अशी चर्चेला वेळ फुटले आहे. याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन अवैध धंदे बंद करावे, अशी मागणी बेलगाव परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

### युवक व्यसनांच्या आहारी

बेलगाव परिसरात अवैध धंदे खुलेआम सुरू असल्याने या परिसरातील महिलांना अनेक प्रकारच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहेत. तर मायबापासमोरच तरुण मुले व्यसनाच्या आहारी जात आहेत. पोलिस प्रशासनाच्या या नाकर्तेपणामुळे परिसरात अवैध धंदे करणार्यांना राण मोकळे मिळत असल्याने पोलिस प्रशासनाच्या या नाकर्तेपणाबद्दल तीव्र रोष व्यक्त केला जात आहे.

## 'हा तर क्षत्रियांचा अपमान', पुष्पा-२ चित्रपटावर गंभीर आक्षेप, 'ते' नाव हटवण्याची मागणी, थेट निर्मात्यांनाही दिली धमकी!

**मुंबई/प्रतिनिधी** :पुष्पा-२ अर्थात पुष्पा-द रुल या चित्रपटाची सध्या सगळीकडेच चर्चा चालू आहे. या चित्रपटात अल्लू अर्जुन, रश्मिका मंदान्ना, फहाद फासील यांच्या कामाचे सिनेरसिक कौतुक करत आहेत. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवरही सगळे रेकॉर्ड मोडताना दिसतोय. दरम्यान, एकीकडे तुफान प्रतिसाद मिळत असताना हा चित्रपट आता वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. राजपूत समजाच्या नेत्यांनी खलनायकाच्या शेखावत या नावावर आक्षेप घेतला असून हा क्षत्रियांचा अपमान आहे, असं म्हटलंय. त्यामुळे आता नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

नेमका वाद काय? आक्षेप कशावर घेण्यात आला?

राजपूत समाजाचे नेते राज शेखावत यांनी पुष्पा-२ चित्रपटावर आक्षेप घेतला आहे. एक्सवर पोस्ट करत त्यांनी या चित्रपटाबाबतचे आपले आक्षेप नोंदवले आहेत. या चित्रपटातील भवरसिंह शेखावत या पात्रावर त्यांनी आक्षेप घेतला आहे. हे पात्र फहाद फॉसील या अभिनेत्याने साकारलेले आहे. या पात्रामुळे शेखावत समाजाची नकारात्मक प्रतिमा उभी राहात आहे, असा दावा त्यांनी केला आहे. तसेच या चित्रपटातील शेखावत हा शब्द सगळीकडून काढून टाकावा, अशी मागणीही त्यांनी चित्रपटाच्या निर्मात्यांकडे केली आहे. हे नाव न हटवल्यास आगामी परिणाम आणि पडसादांना सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# विभागातील सर्व जिल्ह्यांनी ध्वजदिन निधी संकलन इष्टांक पूर्ण करावा- विभागीय आयुक्त दिलीप गावडे

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी** : देशाच्या सिमांचे रक्षण करण्याचे कर्तव्य बजावतांना प्रसंगी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सैनिकांप्रती संपूर्ण देश नतमस्तक व कृतज्ञ आहे. अशा सैनिकांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी उभारल्या जाणाऱ्या ध्वजदिन निधीत योगदान देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. विभागातील सर्व जिल्ह्यांनी आपापल्या जिल्ह्यात ध्वजदिन निधी संकलनासाठी दिला जाणारा इष्टांक पूर्ण करावा,असे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज दिले.



जिल्हा प्रशासन येत्या सन २०२५ पासून दर महिन्यातील एक दिवस सैनिकांसाठी हा उपक्रम राबविण्यात येणार असून या दिवशी सैनिकांचे, माजी सैनिकांचे,त्यांच्या अवलंबितांची कामे विशेषत्वाने मार्गी लावण्यात येतील,असा संकल्प जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी ध्वजदिन निधी संकलन प्रारंभा प्रसंगी व्यक्त केला.

जिल्ह्यातील ध्वजदिन निधी संकलनाचा प्रारंभ आज विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या हस्ते करण्यात आला. मौलाना आझाद संशोधन केंद्र येथील सभागृहात आज हा समारंभ पार पडला.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर(निवृत्त) सय्यदा फिरासत, मेजर सुभाष साळवे, विंग कमांडर जाधव, उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क क्षीरसागर तसेच माजी सैनिक, त्यांचे कुटुंबीय, वीरमाता, वीर पत्नी, वीर पिता आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते शहिद स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सर्व वीरमाता, वीर पत्नी, वीर पिता यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रात कामगिरी बजावणारे माजी सैनिक, त्यांचे पाल्य यांनाही गौरविण्यात आले.

आपल्या संबोधनात पोलीस अधीक्षक राठोड म्हणाले की, कोणत्याही देशाच्या प्रगतीमागे देशाच्या सीमा सुरक्षित असणे हे सगळ्यात महत्त्वाचे कारण असते. त्यासाठी योगदान देणारे सैनिक हे आपल्या देशाच्या प्रगतीला कारणीभूत असतात. त्यासाठी ते प्रसंगी प्राणाचे बलिदान देतात. त्यामुळे त्यांच्याप्रती कृतज्ञ असणे हे आपल्या सगळ्यांचे कर्तव्य आहे.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, जिल्ह्याला ध्वजदिन निधी संकलनासाठी १ कोटी २० लक्ष रुपये इतके उद्दिष्ट असले तरी जिल्हा १ कोटी ५० लक्ष इतके निधी संकलन करुन राज्यात प्रथम क्रमांक मिळवेल. या निधी संकलनात सगळ्यांनी आपला वाटा उचलावा. याशिवाय जिल्हा प्रशासन प्रशासकीय कामकाजात दर महिन्याला एक दिवस सैनिकांसाठी हा उपक्रम राबवुन सैनिकांचे त्यांच्या कुटुंबियांचे प्रशासनाच्यास्तरावरची कामे पूर्ण करेल.

विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी सांगितले की, विभागातील सर्व जिल्ह्यांनी आपापल्या जिल्ह्यात दिलेले ध्वजदिन निधी संकलनाचे इष्टांक प्राधान्याने पूर्ण करुन संपूर्ण विभाग ध्वजदिन निधी संकलनात अव्वल ठेवावा,असे निर्देश त्यांनी दिले. तसेच ध्वजदिन निधीत सढळ हाताने आपले योगदान देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, ते प्रत्येक नागरिकाने द्यावे,असे आवाहनही त्यांनी केले.

प्रास्ताविक मेजर (निवृत्त) सय्यदा फिरासत यांनी केले. सूत्रसंचालन गौतमी आव्हाड यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.




DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### कोल्हापुरात सकल हिंदू समाज आक्रमक ; हिंदूंवरील अत्याचार थांबवण्याची भूमिका




दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी** : बांगलादेश मधील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारांविरोधात आणि स्वामी चिन्मय कृष्णदास महाराजांच्या सुटकेसाठी राज्यभरात आंदोलन करण्यात येत आहे. याच मागणीसाठी कोल्हापुरात सकल हिंदू समाज आक्रमक झालाय. कोल्हापुरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर रोजी सकल हिंदू समाजाच्यावतीने ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी बांगलादेशाचा ध्वज पायदळी तुडवण्यात आला. तसेच आंदोलनात इस्कॉनतर्फे भजन सादरीकरणही करण्यात आले. हिंदूंवरील अत्याचार थांबवण्यासाठी आग्रही भूमिका या आंदोलनातून मांडण्यात आली. त्यामुळे केंद्र सरकारने तातडीने यामध्ये लक्ष घालून चिन्मय कृष्णदास स्वामींची सुटका करावी आणि हिंदू वरील अत्याचार थांबवावेत अन्यथा याचं कोल्हापुरात तीव्र पडसाद उमटतील, असा इशाराही यावेळी सकल हिंदू समाजाच्यावतीने देण्यात आलाय.

### अकोल्यात बांग्लादेशातील हिंदूवर होत असलेल्या अत्याचाराविरोधात जनआक्रोश मोर्चाचे आयोजन




दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी** : अकोल्यात बांग्लादेशातील हिंदूवर होत असलेल्या अत्याचाराविरोधात जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला आहे. त्यानंतर जनआक्रोश सभेचे आयोजन करण्यात आले होते. व्यापाऱ्यांनी प्रतिष्ठाने बंद ठेवून या सभेत सहभागी झाले होते. सभेच्या मार्गावर येणाऱ्या तीन मार्गांवर यज्ञकुंडाचेही आयोजन करण्यात आले होते. हिंसाचारात हिंदुंचा बळी जात असून, शांततेसाठी यज्ञकुंड झाले आहे. या जनआक्रोश सभेत मोठ्या संख्येने हिंदू सहभागी झाले होते. दरम्यान, या मोर्चात अकोल्यातील हिंदूत्ववादी संघटना सहभागी झाल्या होत्या. याच मोर्चात भाजप आमदार हरीश पिंपळेंनी बांग्लादेशचा झेंडा फाडत बांग्लादेशात हिंदुंवर होणाऱ्या अत्याचाराचा निषेध दर्शविला आहे.

### बांग्लादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारा विरोधात अमरावतीत निषेध मोर्चा



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी** : बांग्लादेशामध्ये हिंदू समाजावर होणाऱ्या अत्याचार विरोधात अमरावती शहरात निषेध मोर्चा व सभेचे आयोजन करण्यात आले होते. अमरावती शहरातील जयस्तंभ चौकामधील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला अभिवादन करत निषेध मोर्चाला सुरुवात झाली. यानंतर तसेच मोर्चाचे रुपांतर राजकमल चौकात सभेत झाले. तत्पूर्वी या मोर्चा अमरावती शहराचा जिल्हाभरातून मोठ्या संख्येने हिंदुत्ववादी संघटना, भाजप पदाधिकारी कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली होती.

यावेळी विविध फलकाच्या माध्यमातून हिंदू समाजावर होणाऱ्या अत्याचाराचा विरोध आणि निषेध करण्यात आला. बांग्लादेशमध्ये हिंदू सुरक्षित नाही, त्यामुळे बांगलादेश सरकारने १५ सेकंद साठी त्यांची बॉर्डर उघडावी या १५ सेकंदात त्यांची लायकी व औकात आम्ही दाखवून देऊ असा इशारा माजी खासदार नवनीत राणा यांनी यावेळी दिला आहे. आमच्या भारत देशात एक शेर जिवंत आहे हा शेर बांग्लादेशची सफाई करेल असा नवनीत राणा यांनी यावेळी म्हणाल्या आहेत.

# आ.सिद्धार्थ खरात आज जिजाऊ चरणी होणार नतमस्तक

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर लोणार मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार यांनी विधानसभा सदस्य पदाची शपथ घेतल्या नंतर ते पहिल्यांदाच मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे येत असून सकाळी १० वाजता राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ यांचे दर्शन घेऊन आपल्या कामाची सुरुवात करणार आहेत. आमदार सिद्धार्थ रामभाऊ खरात हे सर्वसाधारण शेतकरी कुटुंबात जन्मलेले असून ताड शिवणी सारख्या दुर्गम गावातून माध्यमिक शिक्षण किनगाव राजा येथे घेतले आहे. त्यांना शिव शाहू फुले,आंबेडकरी चळवळीचे बाळकडू मिळाले आहेत, सुरवातीला त्यांनी पीएसआय, तहसीलदार व मंत्रालयीन कक्ष अधिकारी ते सर्वच महत्वाच्या खात्यात सहसचिव म्हणून सक्षम काम केले आहे. तर पत्नी लोकसेवा आयोगाच्या सचिव आहेत. मुलगी डॉ सांची हिचे एमएस पूर्ण झाले व मुलगा सार्थ हा एमबीबीएस चे शिक्षण घेत आहे. अतिशय सुखसोई सुविधा उपलब्ध असताना सुद्धा त्यांची नाळ मात्र कायम आपल्या गावाशी,गावातील आणि परिसरातील सहकाऱ्यांशी जोडलेली राहिली. मंत्रालयात नोकरी जरी करत असले तरी त्यांनी गावाकडील सहकारी मात्र सोडले नाहीत. त्यामुळे त्यांना नोकरी करत असताना ग्रामीण भागातील समस्या जवळुन पाहिले आहेत. प्रत्यक्षात अनुभवल्या आहेत म्हणून त्यांनी नोकरीचा राजीनामा देऊन सरळ राजकारणात येऊन प्रत्यक्ष जनतेचे सेवा करण्यासाठी त्यांनी संकल्प करत मेहकर लोणार मतदार संघात विधानसभा निवडणूक लढवून म्हाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी आणि शिवसेना जिल्हाप्रमुख, संपर्क प्रमुख, उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे, तालुका अध्यक्ष निंबाभाऊ पांडव,युवा सेनेचे ड.आकाश घोडे, मेहकर शहर अध्यक्ष किशोर भाऊ गारोळे,ड.संदीप गवई यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या बळावर निवडून आल्यानंतर मुंबई येथे शपथविधी घेतला आहे. शपथविधीनंतर पहिल्यांदाच मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे येत आहेत. ते सकाळी ९ वाजता राजमाता जिजाऊ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर,महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करणार आहेत.राजे लखोजीराजे जाधव यांच्या राजवाड्यात त्यांचा सत्कारही करण्यात येणार आहे. तरी मातृतीर्थ सिंदखेडराजा व मेहकर लोणार मतदार संघातील जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आमदार सिद्धार्थ खरात मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



### उर्जास्त्रोत राजामाता जिजाऊचरणी नतमस्त होत कामांचा श्रीगणेशा

राजमाता, राष्ट्रमाता स्वराज्य निर्मितीचे बाळकडू देणराया मॉ जिजाऊ यांच्या जिजाऊ सृष्टीवर नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात हे दि.११ डिसेंबर रोजी सकाळी येणार आहेत. या ठिकाणी आल्यानंतर उर्जास्त्रोत असलेल्या मॉ जिजाऊ यांच्या चरणी नतमस्तक होत उर्जा घेत हे मतदार संघातील कामांना प्रारंभ करणार आहेत.

# क्रिकेट पाठोपाठ जाहिरातींच्या जगातही धोनी ठरतोय 'किंग'

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : भारतीय संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी हे क्रिकेटमधील एक लोकप्रिय नाव आहे. लोकप्रियता दिवसेंदिवस वाढतच चालली आहे.काही वर्षापूर्वी त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेट सोडले असले तरी आजही त्याच्या लोकप्रियतेत कोणतीही घट झालेली नाही. धोनी हा भारताचा सर्वात यशस्वी कर्णधारांपैकी एक आहे. त्यातच आता महेंद्रसिंग धोनीने २०२४ मध्ये ब्रँड एंडोर्समेंटच्या जगात एक नवा विक्रम रचला आहे. .धोनी हा ब्रँड एंडोर्समेंटचा एक नवा चेहरा बनला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कॅप्टन कूल धोनीने २०२४ या वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांतच धोनीने ४२ ब्रँड डील केले आहेत, जे शाहरुख खान आणि अमिताभ बच्चन यांसारख्या मोठ्या स्टार्सपेक्षाही जास्त आहेत.धोनीने २०२४ मध्ये अनेक मोठ्या ब्रँडसोबत भागीदारी केली आहे. यासोबतच तो ब्रँडच्या जाहिरातींच्या संख्येत शाहरुख खान आणि अमिताभ बच्चन यांच्याही पुढे गेला आहे. बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांनी या वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत ४१ ब्रँडसोबत करार केले आहेत. त्याचबरोबर शाहरुख खानने या कालावधीत ३४ ब्रँड्ससोबत करार केले आहेत.पण धोनीने या दोन्ही दिग्गजांना मागे टाकत ४२ ब्रँड्सशी करारांवर स्वाक्षरी केली आहे.

ब्रँडच्या या जाहिरातींमध्ये सिट्रोएन (फ्रेंच कार मेकर), गरूडा एरोस्पेस (ड्रोन तंत्रज्ञान स्टार्टअप), क्लियरट्रिप, पेप्सिको यांचा समावेश आहे. तसेच मास्टरकार्ड, गल्फ ऑइल, (इलेक्ट्रिक सायकल ब्रँड), ओरिएंट इलेक्ट्रिक आणि एक्सप्लोसिव्ह व्हे (फिटनेस आणि न्यूट्रिशन ब्रँड) यांचा समावेश आहे. तंत्रज्ञान असो, खेळ असो की फिटनेस, धोनी हा प्रत्येक क्षेत्रात दिसत आहे. धोनी आता फक्त छ्इ्‌ मध्येच खेळत असला तरी, कंपन्या त्याच्याशी कराराद्वारे जोडले जाण्यास अजूनही उत्सुक आहेत.

धोनी आगामी हंगामात अनकॅप्ड खेळाडू म्हणून खेळताना दिसणार आहे. चेन्नई सुपर किंग्जने त्याला ४ कोटी रुपये मानधनावर कायम ठेवले आहे. बीसीसीआयने आयपीएल २०२५ च्या मेगा लिलावासाठी जुना नियम पुन्हा लागू केला होता, ज्याच्या अंतर्गत कोणत्याही खेळाडूने गेल्या ५ वर्षांपासून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असेल किंवा सलग ५ वर्षे कोणताही आंतरराष्ट्रीय सामना खेळत असेल नसेल, किंवा तो प्लेइंग ११ चा भाग नसेल तर त्याला अनकॅप्ड खेळाडू म्हणून कायम ठेवता येईल. या नियमानुसार धोनी अनकॅप्ड खेळाडू बनला आहे. कारण त्याने ऑगस्ट २०२० मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेट सोडले. तसेच जून २०१९ नंतर एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळला नाही.

### वसुधैव कुटुंबकम्' आणि 'गंमत असते नात्याची' ही नाटके अंतिम फेरीसाठी पात्र

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : ६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत नांदेड केंद्रातून तन्मय ग्रुपच्या 'वसुधैव कुटुंबकम्' या नाटकाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. परभणीच्या राजीव गांधी युवा फोरमच्या 'गंमत असते नात्याची' या नाटकास द्वितीय क्रमांक मिळाला आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे यांनी या निकालांची घोषणा केली. नांदेड येथील कुसुम सभागृहात ता.२५ नोव्हेंबर ते ता.६ डिसेंबर दरम्यान आयोजित प्राथमिक फेरीत एकूण १२ नाटके सादर करण्यात आली. तृतीय क्रमांकासाठी स्वप्नरंग सांस्कृतिक संस्थेच्या 'व्हाईट पेपर' या नाटकाची निवड झाली आहे. परीक्षक म्हणून देवदत्त पाठक, नंदकुमार सावंत आणि डॉ. माणिक वड्याळकर यांनी काम पाहिले.उत्कृष्ट अभिनयासाठी रौप्यपदक नागेश लोकडे (वसुधैव कुटुंबकम्) आणि क्रांती दैठणकर (सेल्फी) यांना मिळाले. तसेच विविध नाटकांतील कलाकारांना गुणवत्ता प्रमाणपत्रांनी गौरवण्यात आले. सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी यशस्वी संघ व कलाकारांचे अभिनंदन केले असून भविष्यातील कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या. यातील 'वसुधैव कुटुंबकम्' आणि 'गंमत असते नात्याची' ही नाटके अंतिम फेरीसाठी पात्र ठरली आहेत. या स्पर्धेसाठी समन्वयक म्हणून किरण चौधरी आणि त्यांच्या टीमने परिश्रम घेतले.

प्रमुख पारितोषिकांचे वितरण पुढीलप्रमाणे झाले:

दिग्दर्शन:
प्रथम – नाथा चितळे (वसुधैव कुटुंबकम्)
द्वितीय – विजय करभाजन (गंमत असते नात्याची)

प्रकाशयोजना:
प्रथम – चेतन ढवळे (वसुधैव कुटुंबकम्)
द्वितीय – श्याम चव्हाण (व्हाईट पेपर)

नेपथ्य:
प्रथम – भिमाशंकर कुलकर्णी (वसुधैव कुटुंबकम्)
द्वितीय – किरण टाकळे (व्हाईट पेपर)

रंगभूषा:
प्रथम – गजस्विनी देलमाडे (वसुधैव कुटुंबकम्)
द्वितीय – शांता देसाई (व्हाईट पेपर)

अभिनयासाठी मोनिका गंधर्व, नीलिमा चितळे, अर्चना चिक्षे, सुषमा कुलकर्णी, किशोर पुराणिक, गौतम गायकवाड,आदित्य उदावंत आणि चंद्रकांत तोरणे यांना गुणवत्ता प्रमाणपत्रे मिळाली.

# माळेगाव यात्रेतील भाविकांना सर्व सोयी-सुविधा मिळण्याच्या दृष्टीने यंत्रणांनी नियोजन करावे- आमदार प्रताप पाटील चिखलीकर

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : नांदेड जिल्ह्यासह आपल्या शेजारील राज्य व जिल्ह्यातील अनेक भाविक दर्शनासाठी माळेगाव येथे दरवर्षी येतात. दक्षिण भारतातील माळेगाव येथे सर्वात मोठी यात्रा दरवर्षी भरते. असंख्य लोकांचे माळेगाव येथील श्री खंडोबा कुलदैवत असून येथील जत्रा ही मागील अनेक वर्षांपासून भक्तांचे श्रद्धास्थान आहे. यात्रेत येणाऱ्या प्रत्येक भाविकांला सर्व सोयी-सुविधा प्राप्त होतील यादृष्टीने संबंधित यंत्रणांनी सूक्ष्म नियोजन करावे , असे प्रतिपादन आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी केले. माळेगाव येथे आमदार प्रताप पाटील चिखलीकराच्या अध्यक्षतेखाली आज आढावा बैठक संपन्न झाली यावेळी ते बोलत होते.




श्री क्षेत्र माळेगाव येथील यात्रेच्या पूर्वतयारीसाठी स्थानिक ग्रामस्थांना विश्र्वासात घेवून नियोजनाच्या दृष्टीने आज माळेगाव येथे आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीस जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार, माळेगावचे सरपंच हनमंत धुळगंडे, प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंजूषा कापसे, पशुवैद्यकिय विभागाचे उपायुक्त डॉ. घुले व वरिष्ठ अधिकारी व माध्यम प्रतिनिधी तसेच मोठया प्रमाणात ग्रामस्थांची उपस्थिती होती.

यात्रेच्या परंपरेप्रमाणे येथील पशुप्रदर्शन, शंकरपट याकडे भाविकांचा अधिक ओढा आहे यासाठी जिल्हा परिषद प्रशासनामार्फत यांचे आयोजन करण्यात येणार आहे. पशुधनाच्या व कृषि विभागाच्या विविध स्टॉलसह विविध स्पर्धाही आयोजित करण्यात येणार आहेत. यात्रेत सीसीटीव्ही, फिरते शौचालय, सुरक्षा व्यवस्था, शालेय मुलांसाठी माळेगाव येथे सहलीचे आयोजन करण्यात यावे, वाहन व्यवस्था तसेच माध्यम प्रतिनिधींसाठी वाहन व्यवस्था करण्यात यावी याबाबत आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी प्रशासनाला सूचना दिल्या. यात्रेसाठी आवश्यक अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी सांगितले.

यात्रेतील भाविकांसह सर्वांना पिण्याचे पाणी, बाजारात विकल्या जाणाऱ्या अन्न पदार्थांची तपासणी करण्याबाबत अन्न व औषध पुरवठा विभागाला सूचना दिल्या. यात्रेतील महत्त्वाच्या ठिकाणी सुरक्षतेच्यादृष्टिने सीसीटीव्ही लावले जाणार आहेत. यात्रेतील सामाजिक सलोखा, शांतता याबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. यात्रेत कोणतेही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, पोलीस विभाग दक्ष आहे. याचबरोबर माळेगावच्या ग्रामस्थही अधिक दक्षता घेवून प्रशासनाला सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.

२९ डिसेंबर २०२४ ते ३ जानेवारी २०२५ या कालावधीत विविध महोत्सव व उपक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. यावेळी महावितरण, पाणी पुरवठा, राज्य परिवहन महामंडळ, शिक्षण विभाग, बीएसएनएल, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अन्न व औषध प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, आरोग्य विभाग, पोलीस प्रशासन, पशुसंवर्धन विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, समाज कल्याण, महिला व बालविकास विभाग, बांधकाम विभाग आदी विभागांनी करावयाच्या कार्यवाहीचा आढावा यावेळी घेण्यात आला.

# खामगावात महाविकास आघाडीचे ईव्हीएम विरोधात जनआंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये मतदानाच्या शेवटच्या तासामध्ये मतदानाच्या टक्केवारीमध्ये वाढ करून मतांची चोरी करून महायुतीने सत्ता मिळविली आहे. या निकालावर शंका उपस्थित करत कॉंग्रेस पक्षाने ईव्हीएम हटाओ लोकशाही बचाओचा नारा देत निवडणुकीत पारदर्शकता आणण्यासाठी बॅलेट पेपरच्या माध्यमातून निवडणुका घेण्याची मागणी केली आहे. कॉंग्रेसच्या वतीने राज्यभर ईव्हीएम विरोधात जनआंदोलन उभारण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी राज्यभर स्वाक्षरी अभियान सुरु केले आहे. त्यानुसार खामगाव विधानसभा मतदार संघात माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर ईव्हीएम विरोधात जनआंदोलन करुन मतपत्रिकेच्या माध्यमातून निवडणुका घेण्यासाठी स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. यावेळी ईव्हीएम विरोधात घोषणाबाजी करून निषेध नोंदविण्यात आला. यावेळी कॉंग्रेस पक्षासह महाविकास आघाडीतील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रयत्नाला यश!

## समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या बदलीचा मार्ग झाला सुकर !

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या बदलीचा मार्ग सुकर झाला असून या संदर्भाततील शासन निर्णय आज निर्गमित झाला आहे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची बदली होत नव्हती . या अभियानांतर्गत नोकरीला लागल्यानंतर एकाच पदावर एकाच ठिकाणी कर्मचाऱ्यांना काम करावे लागत होते या विभागांतर्गत काम करत असलेल्या समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी त्यांच्या



बदली संदर्भातील विनंती केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे केली होती या अधिकाऱ्यांच्या बदली विनंती संदर्भात पाठपुरावा करण्यात आला होता या पाठपुराव्याला यश आले असून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांना संपूर्ण सेवा कालावधीत एक वेळ विशेष बाब म्हणून बदली करण्यास राज्य शासनाने मंजुरात दिली आहे या संदर्भातील शासन निर्णय १० डिसेंबर २०२४ रोजी सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने निर्गमित करण्यात आला आहे त्यामुळे आता राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या बदलीचा मार्ग सुकर झाला आहे ...

# बॅलेट पेपरवर मतदान घेण्याच्या निर्णयाला अडवण्याचा अधिकार सरकारला नाही

### वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची पत्रकार परिषदेत सरकारवर टिका


दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बॅलेट पेपरवर मतदार घेण्ध्याचा निर्णयाला अडविण्याचा अधिकार हा सरकार किंवा पोलिस प्रशासनाला नाही, मात्र सत्तेचा दुरूपयोग भाजप सरकार करीत आहेत. असा आरोप वंचितचे अध्यक्ष अड्. प्रकाश आंबेडकर यांनी करून माकरवाडीबाबत सत्ताधार्यांनी घेतलेल्या निर्णयावर टिकाही केली. वंचित बहुजन आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी माझी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.निवडणूक आयोगाला आम्ही पत्र लिहून सहा नंतर झालेल्या मतदानाचे डिटेल्स मागितले आहेत, उत्तरांची वाट बघत आहोत. ईव्हीएम विरोधात आम्ही आंदोलन सुरु केले आहे.




मारकडवाडी सारखी परिस्थिती गावागावत आहे. गावागावत रोष आहे.मारकडवाडी येथील गावकाऱ्यांचा बॅलेट पेपर वर मतदान घेण्याच्या निर्णयाला अडवण्याचा सरकार किंवा पोलीसांना अधिकार नाही. सरकारने मारकडवाडी येथील ग्रामस्थांना अडविल्याने संशय बळवतो की यांनी गडबड केली आहे. काळजीवाहू मुख्यमंत्र्यांनी मारकडवाडी या गावातील मतदान थांबाविण्याचा आदेश दिला का ? याचा खुलासा एकनाथ शिंदे यांनी करावा. वेळ मिळाला तर मी मारकडवाडीला जाईल. मी अनेकदा म्हटले की हे ईव्हीएम पूर्वी काँग्रेसकडून पाडण्यासाठी वापरले जाते होत. आता हे भाजपा निवडणुका जिंकण्यासाठी वापरले जात आहे. सर्वोच्च न्यायालायचे न्यायाधीशचा मुद्दा बघायलाच तयार नाही. एक देश, एक निवडणूक म्हणजे ज्यांना संविधानाचा चुताडा करायचा आहे. त्यांनी हा सगळा घोटाळा आणला आहे. संविधान खतरे में नाही तर काँग्रेस पक्ष खतरे में आहे.राज्यात आलेले बहुमत हे ईव्हीएमचे बहुमत आहे. सध्या जेवढे पक्ष निवडून आले आहेत ते सर्व भाजपवर लाईन मारत आहेत. त्यामुळे निवडून आलेल्याचा फायदा नाही. काँग्रेसने आम्हाला बाहेर का ठेवले याचा पहिल्यांदा खुलासा करावा, आम्ही भाजपसोबत कधीही समजोता करणार नाही हे आम्ही ठरवले आहे.असे ठाम मत यावेळी त्यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

# नागपूर येथील दोघांना लुटणाऱ्या टोळीतील ६ जणांना अटक, ॲल्युमिनियम व कॉपर घेण्यासाठी बोलावून केली होती ९ लाखांची लुटमार



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** ॲल्युमिनियम व कॉपर घेण्यासाठी नागपूर येथील दोन व्यवसायिकांना नांदुरा शिवारात बोलावून लुटमार करणाऱ्या टोळीतील ६ जणांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. नागपूर येथील व्यापारी राजेंद्रकुमार प्रकाशचंद्र अग्रवाल यांना दलालामार्फत ॲल्युमिनियम व कॉपर घेण्यासाठी नांदुरा येथे बोलावण्यात आले होते. त्यानुसार राजेंद्रकुमार अग्रवाल हे त्यांच्यासाळ्याचा मुलगा हर्ष शशिकांत खेमूका याला घेवून नांदुरा येथे आले होते. यावेळी त्यांना गोडाऊनवर नेण्याच्या बहाण्याने निमगाव नारखेड शिवारात नेवून १० ते १२ जणांनी त्यांच्यावर हल्ला केला. हल्लेखोरांनी अग्रवाल च खेमुका यांच्या गळयातील सोन्याचे गोफ, हातातील सोन्याच्या अंगठया, महागडे मोबाईल, रोख रकम लंपास केला. याबाबत अग्रवाल यांनी नांदुरा पोस्टेला तक्रार दिली होती. त्यावरुन पोलिसांनी गुन्हा दाखल करुन तपास सुरु केला.

दरम्यान या प्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत ६ जणांना अटक केली असून इतर आरोपींचा शोध सुरु आहे. तर अशा एकूण नऊ आरोपी विरुद्ध उपरोक्त गुन्ह्यामध्ये मोक्याची कलम समाविष्ट करण्यात आली असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी विनोद ठाकरे यांनी पत्रकार परिषद मध्ये दिली आहे.

# सकल हिंदू समाजाच्यावतीने बांगलादेशात होणाऱ्या अत्याचारा विरोधात बुलढाण्यात आक्रोश मोर्चा





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा सकल हिंदू समाजाच्या वतीने आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम स्थानिक गर्दे वाचनालय येथे सकल हिंदू बंधू भगिनी यांनी एकत्रित येत भोंडे चौक, तहसील चौक, मार्गे संगम चौक, जयस्तंभ चौक, मार्गे मार्गक्रमण करत जिल्हाधिकारी कार्यालयावर हा आक्रोश मोर्चा धडकला. बांगलादेशात हिंदूवर अन्याय त्याच्यावर होत आहे. हिंदूची घरं, मंदिरे पाडण्यात येत आहेत अशा घटना घडत आहे. त्यामुळे भारतभर या घटनेच्या निषेधार्थ मोर्चे व आंदोलन करण्यात येत आहेत. आज बुलढाणा शहरांमध्ये हिंदू संघटनेतर्फे आक्रोश मोर्चा काढण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने आमदार संजय कुटे, आमदार आकाश फुंडकर ,आमदार चैनसुख संचेती यांच्यासह असंख्य हिंदू बांधवांनी मोर्चात सहभाग नोंदवला व विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन देण्यात आले.

### बांगलादेशात हिंदू समाजावर होणाऱ्या अत्याचार विरोधात सकल हिंदू समाज उतरला रस्त्यावर



दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** बांगलादेशात हिंदू समाजावर अन्याय अत्याचार करण्यात येत आहे. हिंदू समाज बांधवांवर होणारे अत्याचार थांबवण्यात यावे या मागणीसाठी सकल हिंदू समाज रस्त्यावर उतरला आहे. सकल हिंदू समाजाच्यावतीने आझाद मैदान येथून मोर्चा काढण्यात आला. यात नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# अमृत योजनेच्या लाभार्थ्यांना उद्योजकता वाढीसाठी मिळणार प्रशिक्षण

## विविध प्रशिक्षण योजनांसाठी अमृत व एमसीईडी यांच्यात सामांज्यस्य करार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्यात अमृत सूर्यमित्र प्रशिक्षण योजना, अमृत-आयात निर्यात प्रशिक्षण योजना आणि अमृत बेकरी प्रशिक्षण या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सामंजस्य करार करण्यात आला.

याप्रसंगी अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे कार्यकारी संचालक यशवंते यांनी या सामंज्यस्य करारावर स्वाक्षरी केली.

उद्योग क्षेत्राची कमी माहिती आणि आत्मविश्र्वासाचा अभाव यामुळे अनेकजण उद्योजकतेकडे वळण्यात मागे पडतात. अमृत लक्षीत गटातील युवक, युवतींमध्ये उद्योजकेतेचे प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट ठेवून अमृत संस्थेने हे महत्त्वाकांक्षी प्रशिक्षण कार्यक्रम सुरु केले आहे.

अमृत संस्थेच्या सोलार पी.व्ही. इंस्टॉलेशन, आयात-निर्यात आणि अमृत बेकरी प्रशिक्षण योजना या तिन्ही निवासी प्रशिक्षण योजनांचा कालावधी १८ दिवसांचा आहे. यात ८० टक्के तांत्रिक प्रशिक्षण व २० टक्के उद्योजकता विकास यावर भर देण्यात येईल. आयात-निर्यात प्रशिक्षण यामध्ये आयात निर्यात प्रक्रिया, परकीय व्यापार धोरण, डीजीएफटी, अपेडा याबद्दल मार्गदर्शन केले जाईल.

सूर्यमित्र प्रशिक्षण, अमृत-बेकरी प्रशिक्षण योजनेत फक्त तांत्रिक ज्ञानच मिळणार नसून उद्योग उभारणीसाठी मदत दिली जाईल. अमृत संस्थेच्या तिन्हीही योजनांची वैशिष्ट्ये म्हणजे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर प्रकल्प अहवाल, कर्ज प्रस्ताव, उद्योग नोंदणी, कच्चा माल खरेदी याबाबत अमृत संस्था मार्गदर्शन करणार आहे.

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राकडून दोन वर्षांपर्यंत लाभार्थ्यांचा पाठपुरावा करुन उद्योग उभारणीसाठी आवश्यक ते सहकार्य करणार आहे. प्रशिक्षणानंतर लाभार्थ्यांना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना या शासकीय योजनांच्या सहाय्याने उद्योगासाठी भांडवल उभे करता येणार असल्याने अमृत लक्ष्ज्ञित गटाच्या उन्नतीसाठी या योजना मैलाचा वाटा ठरणार आहेत. पात्र लाभर्थ्यांचा प्रशिक्षणाचा खर्च व प्रशिक्षण कालावधीतील निवास, भोजन व्यवस्था अमृत संस्थेमार्फत केली जाणार असल्याने अधिकाधिक युवक-युवती आपले उद्योजकतेचे स्वप्न साकार करण्यासाठी अमृत योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमृत संस्थेमार्फत करण्यात आले आहे.

अमृत संस्थेच्या योजना महाराष्ट्रातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील खुल्या प्रवर्गासाठी तयार करण्यात आल्या आहेत. अमृतच्या लक्षीत गटातील युवक, युवती आणि इतर उमेदवारांना, प्रोत्साहन देण्याचा हा प्रयत्न आहे. अमृत संस्थेच्या योजनेचा लाभ घेत आपल्या उद्योजकतेला नवी ओळख देण्यासाठी इच्छुकांनी www.mahaamrut.org.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## विविध वृत्त...

### शेतकरी उत्पादक संस्था व कंपन्यांच्या माहितीचे संकलन सुरु

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शेतकरी उत्पादक संस्था व कंपन्यांसाठी धोरण निश्र्चिती व त्यांचे बळकटीकरण करण्यासाठी जिल्ह्यातील संस्था व कंपन्यांची माहिती संकलित करण्याचे काम सुरु झाले आहे.

ही माहिती राज्यस्तरावरील कृषी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व स्थापन झालेल्या शेतकरी उत्पादक संस्था व कंपन्यांनी त्यांची अचुक माहिती जवळच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील बीटीएम किंवा एटीएम यांच्याकडे दि.१५ डिसेंबर २०२४ पूर्वी उपलब्ध करून देण्यात यावी, असे आवाहन प्रकल्प संचालक आत्मा कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

### सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्यावतीने फोटोग्राफीचे प्रशिक्षण संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सेंट ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था बुलढाणा यांच्या मार्फत मोफत ३० दिवसीय फोटोग्राफी व व्हिडिओग्राफीचे प्रशिक्षण संपन्न झाले. हे प्रशिक्षण ४ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीमध्ये राबविण्यात आले होते.

या प्रशिक्षणामध्ये बेसिक कॅमेरा सेटिंग, स्टुडिओ पोर्टेट, मॉडेलिंग फोटो, टेबल टॉप फोटोग्राफी, वेडिंग फोटोग्राफी, स्टुडिओ सेट व लाइटिंग, व्हिडिओ कॅमेरा सेटिंग याविषयी अद्ययावत मार्गदर्शन करण्यात आले.

फोटोग्राफी व व्हिडिओग्राफीसाठी प्रशिक्षक म्हणून तज्ञ प्रशिक्षिका धनश्री टेकाडे यांची निवड करण्यात आली होती. संस्थेचे संचालक संदीप पोटे यांनी मूलभूत बँकिंग, बँकेची व्याख्या, बँकांचे वर्गीकरण, ठेवीचे प्रकार, कर्जाचे प्रकार, मुद्रा कर्ज, सामाजिक सुरक्षा योजना याविषयी सविस्तर माहिती दिली.

यावेळी प्रशिक्षक स्वप्नील गवई, श्रीकृष्ण राजगुरे, सहाय्यक प्रशांत उबरहंडे, मनीषा देव, आणि कल्पना पोपळघट यांनी प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले. आरसेटी तर्फे बेरोजगार सुशिक्षित तरुण-तरुणींना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देण्यात येते. या प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांची सेंट ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था बुलढाणा येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### रेतीची अवैध वाहतूक करणारे दोन टिप्पर जप्त; कोलवडनजीक उपविभागीय अधिकाऱ्यांची कारवाई





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा उपविभागीय अधिकारी शरद पाटील हे पथकासह धाड येथे जात असताना समोरून दोन टिप्पर येत असल्याचे त्यांना दिसले. त्याची पाहणी केली असता त्यामध्ये रेतीची अवैध वाहतूक होत असल्याचे समोर आले. दोन्ही टिप्पर जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे आता रेती माफियांचे धाबे दणाणले असून, कारवाईत उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांनी दोन टिप्पर ताब्यात घेत तहसील कार्यालयाच्या मागील निवडणूक विभागाच्या प्रांगणात वाहने उभी केली आहेत. बुलढाणा उपविभागीय अधिकारी शरद पाटील, मंडळ अधिकारी अशोक शेळके,तलाठी गोपाल राजपूत व चालक गजानन ताकतोडे यांनी ही कारवाई केली आहे. उपविभागीय अधिकारी शरद पाटील हे आपल्या पथकासह धाडकडे जात असताना त्यांना समोरून दोन टिप्पर येताना दिसले, या वाहनांत रेतीची अवैध वाहतूक होत असल्याचा संशय आल्यामुळे टिप्पर थांबिण्याची सूचना केली. कोलवडजवळ दोन्ही टिप्पर थांबवून विचारपूस केल्यावर दोन्ही टिप्परमध्ये रेती असून, त्यांच्याकडे रॉयल्टी नसल्याचे समोर आले. त्यामुळे पंचनामा करून टिप्पर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. हे दोन्ही टिप्पर बुलढाणा तहसील कार्यालयाच्या मागे असलेल्या निवडणूक विभागाच्याप्रांगणात उभे करण्यात आले आहेत. या दोन्ही टिप्परवर प्रत्येकी २.५० लाख रुपये दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

### नोकरीचा पहिला दिवस अन् घरी परतताना घात झाला, कुर्ल्यातील बस अपघातात आफरिन शाहने जीव गमावला

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईच्या एलबीएस रोडवर कुर्ला परिसरात सोमवारी रात्री बेस्ट बसचा भीषण अपघात झाला होता. बेस्ट बस कुर्ला येथील गजबजलेल्या परिसरातून जात असताना चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि बस थेट गर्दीत शिरली. या अपघातात अनेकजण चिरडले गेले. बेस्ट बसचा ब्रेक फेल झाल्यामुळे हा अपघात झाल्याचे सांगितले जात आहे. या अपघातात आतापर्यंत एकूण ७ जणांचा मृत्यू झाल असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे. या घटनेमुळे मुंबईत एकच खळबळ उडाली असून बेस्ट प्रशासन आणि कंत्राटी कर्मचारी याबाबत अनेक प्रश्न नव्याने ऐरणीवर आले आहेत.